मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 21 डिसेंबर 2024 | पान- 1

# चिंचवड महानगरपालिकेची बांधकाम प्रकल्पांसाठी कठोर मार्गदर्शक तत्त्वे !

## बांधकाम प्रकल्पांसाठी पर्यावरणपूरक नियमावली जारी : ध्वनी प्रदूषण टाळणे, जलसंधारणाला चालना, आणि कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी पुढाकार..

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी - चिंचवड शहरामध्ये झपाट्याने औद्योगिकीकरण वाढते आहे. याचबरोबर शहरामध्ये मोठ्याप्रमाणात बांधकामांची संख्यासुध्दा वाढत असून महानगरपालिकेने नागरिकांना चांगले जीवनमान देण्याच्या हेतूने शाश्वत आणि पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती स्वीकारली आहे. त्यासाठी पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी याबाबत परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकानुसार, सदर उपाययोजना नागरिकांच्या तक्रारींचा विचार करून आणि क्रेडाई (कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेसोबत चर्चा करुन ठरविण्यात आल्या आहेत. शाश्वत शहरी विकासाला चालना देण्यासाठी या नवीन नियमांमध्ये ध्वनी प्रदूषण, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.



### आता शहरामध्ये रात्रीच्या बांधकामांवर बंदी...

» शहरातील नागरिकांकडून करण्यात आलेल्या तक्रारींनंतर रात्री १० ते सकाळी ७ या वेळेमध्ये पिंपरी - चिंचवड हद्दीतील बांधकामांवर बंदी घालण्यात आली आहे. यासोबतच सर्व नवीन गृहनिर्माण प्रकल्पांसाठी वैयक्तिक पाणी मीटर बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे पाण्याच्या वापराचा वैयक्तिक स्तरावर मागोवा घेता येणार असून यामाध्यमातून पाण्याचा अपव्यय टाळता येणार आहे. याशिवाय, गृहनिर्माण युनिट्समध्ये बांधकाम व्यावसायिकांनी घराचा ताबा देताना एरेटर टॅप्स बसवणे देखील अनिवार्य करण्यात आले आहे.

### बांधकाम पाडणीच्या कचरा व्यवस्थापनावर भर

» पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेने बांधकाम आणि बांधकाम पाडणीच्या कचऱ्यासाठी दररोज १५० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे व्यवस्थापन केले आहे. नवीन नियमांनुसार बांधकाम व्यावसायिकांना त्यांच्या प्रकल्पातून मिळणाऱ्या किमान १० टक्के पुर्नप्रक्रिया केलेल्या वस्तू म्हणजेच पेवर ब्लॉक सारख्या रचना नसलेल्या वस्तू वापरासाठी घेणे बंधनकारक असेल. सदर परिपत्रकाचे बांधकाम व्यावसायिकांनी पालन न केल्यास त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नाही. असा सुध्दा नियमावलीमध्ये उल्लेख केला आहे.

> "नागरिकांच्या समस्या सोडवण्याबरोबरच पर्यावरणपूरक विकास आणि शाश्वत शहरी विकासासाठी आम्ही ही पावले उचलत आहोत. जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक उपायांवर भर देऊन आम्ही भविष्यासाठी व शाश्वत शहर निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत."
> -शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# नववर्षानिमित्त अमली पदार्थांना आळा घाला : ॲड. गोरडे

## असे आवाहन पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या पोलिस आयुक्तांना केले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

'नववर्षाच्या स्वागतोत्सवात अमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने स्टिंग ऑपरेशन राबवावे.", असे आवाहन ज्येष्ठ विधिज्ञ व विश्व हिंदू परिषद, विधी प्रकोष्ठाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे यांच्यासह इतर वकीलांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या पोलिस आयुक्तांना केले आहे. या मागणीचे पत्र त्यांनी दोन्ही आयुक्तांना पाठवले आहे.



या निवेदनात ॲड.गोरडे यांनी म्हटले आहे की, शिक्षणाचे माहेरघर असा लौकिक असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील अल्पवयीन तरुण-तरुणींना अगदी सहजपणे अमली पदार्थ उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २०२५ या नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने महाविद्यालयातील तरुण आणि तरुणी कुतूहल अन् आकर्षणापोटी अमली पदार्थांकडे ओढले जातात. ही बाब हेरून तरुण पिढीला अमली पदार्थ सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अमली पदार्थांची निर्मिती, विक्री व वाहतूक करणाऱ्यांद्वारे (ड्रग्ज पेडलर) होण्याची दाट शक्यता आहे."

या पत्रावर विधी प्रकोष्ठ संयोजक ॲड. शैलेश भावसार, सहसंयोजक ॲड. सोहम यादव, ॲड. संकेत राव, ॲड. कृष्णा वाघमारे आदींनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# महापालिकेच्या हद्दीत रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांना आर्थिक दंड...

## नागरिकांना रंगेहाथपकडून महापालिकेच्या पथकांनी त्यांना तब्बल एकूण 60 हजार रुपयांचा दंड ठोठावला

**पिंपरी | प्रतिनिधी**

रस्त्यांवर रात्री अपरात्री कचरा टाकणाऱ्या नागरिकांना रंगेहाथपकडून महापालिकेच्या पथकांनी त्यांना तब्बल एकूण ६० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.




शहराच्या वाकड, हिंजवडी, देहूरोड, मामुर्डी या उपनगरांच्या सीमेलगत अनेक ठिकाणी रात्री बाहेरील लोक कचरा टाकून निघून जातात. तसेच, विक्रेत्यांकडून कचरा टाकून परिसर अस्वच्छ केला जात आहे. भाजीपाला, खाद्यपदार्थ, फळे-फुले विक्रेते व अन्य पथारी व्यावसायिक रात्री घरी जाताना कचरा, उरलेले अन्नपदार्थ टाकून जातात. या बेशिस्त विक्रेते व नागरिकांवर महापालिकेच्या विशेष पथकांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे.

शहराबाहेरील हिंजवडी, देहूरोड, मामुर्डी आदी परिसरातून तसेच, विक्रेत्यांमार्फत शहरात कचरा टाकून अस्वच्छता केली जात आहे. रात्रीच्या वेळी परिसर अस्वच्छ करणाऱ्या तसेच, सार्वजनिक आरोग्यासाठी हानीकारक कृत्य करणाऱ्या नागरिक, अस्थापनांवर कारवाईसाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या पथकाकडून ही कारवाई केली जात आहे. गेल्या १५ दिवसांत ६० हजारांहून अधिकचा दंड वसुल करण्यात आला आहे, असे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी सांगीतले.

# मानवधर्म हाच विश्वाचा धर्म : सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

**परिवार समाज, गाव देश, राष्ट्र यांची मुक्त सेवा करण्याची प्रेरणा आणि अनुकरण आपण करावे. यासाठी अशा महोत्सवातून सेवाव्रत घेऊन चालूया असा संदेशही त्यांनी दिला.**



**पुणे | प्रतिनिधी**

हिंदू धर्म हा शाश्वत धर्म असून, या चिरंतन व सनातन धर्मातील आचार्य सेवाधर्माचे पालन करतात, हा सेवाधर्म म्हणजेच मानवधर्म आहे आणि मानवधर्म हाच विश्वाचा धर्म असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेच्या वतीने शिक्षण प्रसारक मंडळीच्या महाविद्यालयाच्या मैदानात हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २२ डिसेंबरपर्यंत हा महोत्सव सुरू आहे.

हिंदू संस्कृती, संस्कार आणि सामाजिक सेवाकार्याची माहिती सादर करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अनेक देवस्थाने, सामाजिक, धार्मिक संस्था, मठ मंदिरांच्या सेवाकार्याचा त्यात सहभाग आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर स्वामी गोविंददेवगिरी महाराज, ज्योतिष तज्ज्ञ लाभेश मुनीजी महाराज, इस्कॉनचे गौरांग प्रभू, शिक्षण प्रसारक मंडळीचे अध्यक्ष अ‍ॅड. एस. के जैन, उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, हिंदू सेवा महोत्सवाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे राष्ट्रीय संयोजक गुणवंत कोठारी, हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. भागवत पुढे म्हणाले की, सेवा करताना प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा आपला स्वभाव असतो. दिखाव्यासाठी सेवा न करता ती निरंतर करत राहणारे सेवेची कामना करतात. सेवेचा धर्म सांभाळताना अतिवादी न होता त्याचा मध्यम मार्ग आपण देशकाल परिस्थितीनुसार स्वीकारायला हवा. मानव धर्म हाच विश्वाचा धर्म असून तो सेवेतून प्रकट व्हावा. आपण विश्वशांतीसाठी घोषणा देतो मात्र अल्पसंख्याकांची काय अवस्था इतरत्र आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. तीन हजार वर्षापेक्षा अधिक परंपरा असलेले शस्त्र, वाचन, इतिहास, स्वभाव आपले आहे. ते पाहणे आणि अंगीकारणे, पुढील पिढ्यांना त्यातून प्रेरणा देणे यासाठी असे हिंदू सेवा महोत्सवासारखे उपक्रम आहेत. पोट भरण्यासाठी आवश्यक ते केलेच पाहिजे पण गृहस्थाश्रमापलीकडे आपण जे जे मिळाले आहे ते सेवा रूपाने दुप्पट द्यायला हवे. जग आपले प्रतिपालक आहे. उपभोगाची वस्तू नाही ही भावना असेल तर परिवार समाज, गाव देश, राष्ट्र यांची मुक्त सेवा करण्याची प्रेरणा आणि अनुकरण आपण करावे. यासाठी अशा महोत्सवातून सेवाव्रत घेऊन चालूया असा संदेशही त्यांनी दिला.

हिंदू धर्म हा शाश्वत धर्म असून, या चिरंतन व सनातन धर्मातील आचार्य सेवाधर्माचे पालन करतात, हा सेवाधर्म म्हणजेच मानवधर्म आहे आणि मानवधर्म हाच विश्वाचा धर्म असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

### घटेंगे तो कटेंगे

» हिंदू या शब्दाशी तडजोड होता कामा नये. हा एकच शब्द तारणारा आहे. आजवर सेवा करून त्याची कधी जाहिरात केली नाही. मात्र आजचा काळ वेगळा आहे. आपले काम एकत्रितपणे समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. जातीपातींतून बाहेर येऊन हिंदू म्हणून देशाची सेवा केली पाहिजे. बटेंगे तो कटेंगे ते कळते, तसेच घटेंगे तो कटेंगे हेही लक्षात घेण्याची गरज आहे. देशाला समर्थ करण्यासाठी हिंदूंना समर्थ व्हावे लागेल, असे गोविंददेव गिरी म्हणाले.

# कर थकविणाऱ्या 75 मिळकतींना टाळे

**अठरा दिवसांत 40 कोटी रुपयांची वसुली**



**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मिळकतकर वसुलीसाठी कर संकलन विभागाने थकबाकीदारांच्या दारात बँड वाजविण्यासह, मिळकती सील करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत मागील अठरा दिवसांत कर संकलन विभागाने तब्बल ७५ मिळकती सील करून ताब्यात घेतल्या आहेत. तर सुमारे ३१७ मिळकतधारकांकडून ४० कोटी ६८ लाख रूपयांचा कर वसूल करण्यात आला आहे.

कर संकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी ही माहिती दिली. महापालिकेकडून सुमारे १४ लाख ८० हजार मिळकतधारकांना २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मिळकतकराची बिले पाठविण्यात आली आहेत. त्यातील ८ लाख ८४ हजार मिळकतधारकांनी आतापर्यंत सुमारे १,८४१ कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे.

तर उर्वरित सहा लाख मिळकतधारकांनी अद्यापही कर भरलेला नाही. त्याच वेळी या विभागास या वर्षीच्या अंदाजपत्रकात २,७२७ कोटींचे कर वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आर्थिक वर्षाचे शेवटचे तीन महिने शिल्लक असतानाच अद्यापही ८५० कोटींच्या वसुलीचे उद्दिष्ट अद्याप बाकी आहे.

त्यामुळे कर संकलन विभागाकडून शहरात आक्रमक भूमिका घेत मिळकतींच्या समोर बँड वाजविणे तसेच मिळकती सील करण्याची कारवाई सुरू केलेली आहे. त्यातून दिवसाला दोन ते अडीच कोटींची वसुली होत असल्याचे चित्र आहे. शहरातील मिळकतकर वसुलीसाठी कर संकलन विभागाने थकबाकीदारांच्या दारात बँड वाजविण्यासह, मिळकती सील करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत मागील अठरा दिवसांत कर संकलन विभागाने तब्बल ७५ मिळकती सील करून ताब्यात घेतल्या आहेत.

# पुण्यात संजय राठोडांच्या विरोधात बॅनरबाजी

**'लाडक्या बहिणी'चा उल्लेख करत केला सवाल**




**पुणे | प्रतिनिधी**

महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार नागपुरात नुकताच पार पडला. एकूण 39 आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान शिवसेना आणि भाजपमधून विरोध होत असताना देखील आमदार संजय राठोड यांना मंत्रीपद देण्यात आलं आहे, त्यानंतर आता पुण्यात त्यांच्या नावाला विरोध होताना न येत आहे . 'राठोडचा डाग शिंदेंच्या कपाळी' अशा प्रकारचे मजकूर लिहून कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या चेहऱ्यावरती क्रॉसफुली मारत बॅनर लावण्यात आले आहे.

राज्य सरकारने निवडणुकीदरम्यान, लाडकी बहीण योजना आणून महिलांचा आर्थिक विकास करण्यासाठी प्रयत्न केले. तर दुसरीकडे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या महायुतीच्या मंत्रिमंडळात महिलांवर अत्याचार करण्याचा आरोप असणाऱ्या नेत्याची वर्णी लागली आहे. महायुतीतील कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्याविरुद्ध पुण्यात बॅनरबाजी करण्यात आली आहे. यामध्ये "एकीकडे स्त्रियांसाठी लाडकी बहीण तर दुसरीकडे एका निष्पाप महिलेच्या हत्येचा आरोप असणाऱ्या आमदारास कॅबिनेट मंत्रीपद" असा मजकूर लिहिण्यात आला आहे. अज्ञाताकडून हे बॅनर लावण्यात आले आहे कारण त्याच्यावर कोणाच्याही नावाचा उल्लेख नाही. मात्र, महायुती सरकार हाच का तुमचा न्याय अशा प्रकारचे बॅनर रस्त्याच्या मधोमध लावण्यात आलेले आहेत. या बॅनरमुळे पुण्यात चांगली चर्चा रंगली आहे.

शिवसेनेकडून 11 जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. शिवसेनेचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर यांना डच्चू दिला आहे. तानाजी सावंत, अब्दुल सत्तार यांच्यासह संजय राठोड यांना पुन्हा मंत्रिपद देऊ नये, अशी भाजप पक्षाची देखील आग्रही मागणी होती. वादग्रस्त, आरोप असलेले चेहरे मंत्रिमंडळात नको, अशी चर्चा होती. पण तरीही संजय राठोड यांना मंत्रिपद देण्यात आले आहे.

# पोलीस आयुक्तालयाने थकवले कोट्यवधींचे भाडे

## भाडे वसुलीसाठी महापालिकेचा पोलीस आयुक्तालयाकडे पाठपुरावा : पालिकेच्या 22 इमारती भाड्याने

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने पिंपरी-चिंचवड पोलिसांना 22 इमारती व मालमत्ता भाड्याने दिल्या आहेत. भाड्यापोटी पोलीस आयुक्तालयाकडून महापालिकेचे गेल्या 19 वर्षांपासूनचे तब्बल 7 कोटी 55 लाख 12 हजार रुपयांचे भाडे थकविले आहे. कर्तव्यदक्ष असलेला पोलीस विभाग किती शिस्तप्रिय हे यावरून उघड होत आहे.

पुणे शहर व ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणे मिळून नव्याने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. शहरात 15 ऑगस्ट 2018 पासून नवीन आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले.

चिंचवडमधील प्रेमलोक पार्क येथील महापालिकेच्या महात्मा फुले शाळेची इमारत पोलिस आयुक्तालयासाठी भाडे तत्त्वावर देण्यात आली. एक जानेवारी 2019 पासून प्रेमलोक पार्क येथील नवीन इमारतीतून पोलिस आयुक्तालयाचे कामकाज सुरू आहे. शहराच्या विविध भागात पोलिस ठाण्यासाठी महापालिकेच्या मालमत्ता पोलिसांसाठी भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत.




### अनेक इमारती दिल्या भाड्याने

स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरू झाल्यानंतर पोलिस आयुक्तांनी विविध कामकाजासाठी महापालिकेच्या इमारती भाडेतत्त्वावर देण्याबाबतची मागणी केली. त्यानुसार, पोलिस उपायुक्त परिमंडळ तीनच्या कार्यालयासाठी चिंचवड स्टेशन येथील प्रीमिअर प्लाझा येथील दोन मजली इमारत भाडे तत्त्वावर देण्यात आल्या आहेत. सांगवीतील भाजी मंडईसाठी विकसित केलेले गाळे सांगवी पोलिस ठाण्याच्या इमारतीसाठी देण्यात आले.

गांधीनगर, पिंपरीतील मेघाजी लोखंडे कामगार भवन, मोहननगर येथील बहुउद्देशीय इमारत, पिंपळे गुरवमधील राजमाता जिजाऊ उद्यानातील क्वॉर्टर्स, दिघी, वडमुखवाडी येथील जागाही पोलिसांच्या वाहतूक विभाग, गुन्हे युनिट शाखा या विविध विभागासाठी भाडे तत्त्वावर दिल्या आहेत.

पोलीस मुख्यालयासाठी निगडी येथील कै. अंकुश बोऱ्हाडे शाळेची इमारत तसेच, मोकळी जागाही दिली आहे. थेरगाव पोलिस चौकीसाठी महिला विकास केंद्राची इमारत अशा एकूण 22 इमारती व गाळे सन 2005 पासून पोलिसांना भाड्याने दिल्या आहेत. यामधील बहुतांशी मालमत्तांचा महापालिकेबरोबर करारनामाही करण्यात आलेले नाही. तेव्हापासून आजपर्यंत काही इमारत व गाळ्यांचे भाडे पोलिसांनी जमा केलेले नाही. गेल्या 19 वर्षांत पोलीस खात्याकडून महापालिकेचे 7 कोटी 55 लाख 12 हजार 852 रुपये भाडे थकविण्यात आलेले आहे.

### महापालिकेचा पोलीस आयुक्तालयाकडे पाठपुरावा

» पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासह विविध पोलिस ठाणे व चौकी यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 22 मालमत्ता पोलिसांना भाडे तत्त्वावर दिल्या आहेत. या भाड्यापोटी पोलिसांकडे 7 कोटी 55 लाख 12 हजार रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीसंदर्भात पोलिस विभागाशी सातत्याने संपर्क सुरू आहे, असे महापालिकेच्या भूमि आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

### कार्यालयाचे नाव थकबाकी

- पोलीस आयुक्तालय इमारत २ कोटी ६० लाख ५६ हजार
- दिघी पोलीस ठाणे १ कोटी ९१ लाख ३५ हजार
- वाहतूक शाखा, चापेकर चौक १ कोटी ३१ लाख ७ हजार
- पोलीस मुख्यालय, निगडी ६० लाख ४९ हजार
- थेरगाव पोलीस चौकी ३५ लाख २३ हजार
- पोलीस उपायुक्त, परिमंडळ- ३ १८ लाख ५६ हजार
- सांगवी पोलीस ठाणे १० लाख ६४ हजार
- गुन्हे युनिट -३, मोहननगर ८ लाख ९७ हजार

# चिंचवडमध्ये दुमदुमला 'मोरया मोरया'चा गजर

## श्रीमन् महासाधु श्रीमोरया गोसावी महाराज यांचा 463वा संजीवन समाधी सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमन् महासाधु श्रीमोरया गोसावी महाराज यांच्या ४६३व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त चिंचवड देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने श्री मोरया गोसावी महाराज यांच्या पदांवर आधारित 'माझ्या मोरयाचा धर्म जागो' या भक्तीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर याठिकाणी करण्यात आले होते.




कार्यक्रमाच्या सुरवातीला चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त ॲड. देवराज डहाळे, स्वानंद मोकाशी यांच्या हस्ते गायक कलाकारांचा चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सन्मान करण्यात आला.

'माझ्या मोरयाचा धर्म जागो' या पदाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर 'तुज मागतो मी आता', 'मोरया तू जनक जननी; मोरया ही तुज विनवणी', 'माझ्या स्वामींचे भोगविलास रे; चला जाऊ पाहू मोरयास रे', 'माझी मयूर हीच पंढरी', 'मोरेश्वर गाव बरवा ठाव; तेथे नांदतो मोरया देव', खेळिया, 'पवनेच्या काठी संजीवन योगी; श्रीगणेशाचे भक्त मोरया गोसावी', 'मज सुख पावले हो', 'अहो थेऊर गाव तेथे देव चिंतामणी', 'सुखी नांदत होते मी संसारी', 'भीमा तटी स्थळभूमी सिद्धटेक', 'अजी आनंद आनंद' या श्री मोरया गोसावी महाराजांच्या पदांनी संपूर्ण वातावरण मोरयामय झाले होते. या पदांबरोबरच 'मल्हारवारी मोतीयाने द्यावी भरून; नाहीतर देवा जातो मी दुरून' आणि 'उदो ग अंबे उदो' या गाण्यांमधून यावेळी देवीचा जागर करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संगीत संयोजन सुप्रसिद्ध संगीतकार प्रसन्न बाम, सागर दहिगावकर यांनी केले होते. तर अजित विसपुते, आशिष देशमुख, राधिका अत्रे यांनी गीतगायन केले. कोरसमध्ये नयना अंजनकर, तन्मय मोमीनकर, विजय खापेकर, जयवंत राजपुरे यांनी साथसंगत केली. तर बासरी वादन निलेश देशपांडे, तबल्याची साथ जयंत क्षीरसागर व अमित कुंटे, की-बोर्डची साथ मिहीर भडकमकर, विनीत तिकोणकर यांनी पखवाज व ढोलकीची साथ तर टाळ वाद्याची साथ अपूर्व द्रविड यांनी केली. तर या कार्यक्रमाच्या निवेदनाची जबाबदारी निरुपणकार राधिका अडीवरकर यांनी पार पाडली.

# स्वच्छ पुण्यासाठी महापालिका ‘आक्रमक’

## महापालिकेकडून शहरातील अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून तब्बल 40 लाखांचा दंड वसूल

**पुणे | प्रतिनिधी**

स्वच्छ पुणे सुंदर पुणे ठेवण्यासाठी एका बाजूला महापालिका दरवर्षी कोट्यवधीचा खर्च करत असली, तरी दरवर्षी जवळपास ४० ते ५० हजार नागरिकांकडून शहरात सार्वजनिक ठिकाणांसह शहरात वेगवेगळ्या प्रकारे कचरा करणे, तसेच नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण होईल, असे कृत्य केले जाते. अशा नागरिकांवर महपालिकेकडून मागील काही वर्षांत कारवाईचा बडगा उगारण्यात आला असून, अशा अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांवर केली जाणारी दंडात्मक करवाई जवळपास आठपटीने वाढली आहे.



२०२० मध्ये महापालिकेकडून शहरातील अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून तब्बल ४० लाखांचा दंड वसूल केला होता. हा दंडाचा आकडा २०२४ या वर्षांत तब्बल ३ कोटी ७ लाखांच्या घरात पोहोचला आहे. विशेषत: मागील दोन वर्षांत महापालिकेने शहरात कारवाई वाढविली असल्याचे चित्र आहे. या दंडात्मक कारवाईमुळे अस्वच्छता करणाऱ्यांना चांगलीच जरब बसली आहे.

जानेवारी ते डिसेंबर २०२०
– ४० लाख ६९ हजार
जानेवारी ते डिसेंबर २०२१
– ९६ लाख ५९ हजार
जानेवारी ते डिसेंबर २०२२
-१ कोटी १९ लाख ३५ हजार
जानेवारी ते डिसेंबर २०२३ –
१ कोटी ६६ लाख ४६ हजार
जानेवारी ते डिसेंबर २०२४
– ३ कोटी ७ लाख ११ हजार

### स्वच्छतेसाठी उपविधी

» शहर स्वच्छतेसाठी महापालिकेकडून सार्वजनिक स्वच्छता उपविधी करण्यात आली आहे. त्यानुसार पालिकेकडून दंडात्मक कारवाईचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या उपविधीची अंमलबजावणी गेल्या अडीच वर्षांपासून महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या उपविधीनुसार सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, कचरा जाळणे, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणे, कचरा वर्गीकरण करून न देणे, बांधकामाचा राडारोडा टाकणे, बंदी असलेले प्लॅस्टिक वापरणे, पाळीवर प्राण्यांची शहरात अस्वच्छता करणे, कबुतरांना खाद्य टाकणे या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

“ महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. तरीही नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करतात. वारंवार सूचना देऊनही हा प्रकार कमी होत नसल्याने दंडात्मक कारवाई केली जाते. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर स्वतंत्र पथके नेमली आहेत.

**- संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग.**

# कात्रज-कोंढवा रस्ता आता 84 मीटर होणार

## संपादनासाठी राज्य सरकारकडे आणखी 231 कोटी रूपयांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून कात्रज-कोंढवा ( खडीमशिन चौक) पर्यंत रस्ता रूंदीकरण करत हा रस्ता ८४ मीटर करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, रस्ता ८४ मीटर रूंद करण्यासाठी भूसंपादनास मोठ्या प्रमाणात निधी लागणार असल्याने महापालिकेने हा रस्ता ५० मीटर करण्याचा निर्णय घेत शासनाकडे या रस्त्यासाठी २०० कोटींची मागणी केली होती. मात्र, शासनाने केवळ १४० कोटींचा निधी पालिकेस दिला.



मात्र, आता अवघ्या दोन वर्षांतच महापालिकेने पुन्हा एकदा आपला निर्णय बदलला असून आता हा रस्ता पुन्हा ८४ मीटर केला जाणार आहे. यासाठी सुमारे तब्बल ९० हजार चौरस मिटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्याच्या भूसंपादनासाठी महापालिकेने आणखी २३१ कोटी रुपयांची मागणी राज्य सरकारकडे केल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

महापालिकेकडून या रस्त्याचे काम मागील सहा वर्षांपासून सुरू आहे. हा चार किलोमीटरचा रस्ता करण्यासाठी पालिकेस भूसंपदानासाठी ७१० कोटींची गरज होती. मात्र, निधी अभावी पालिकेने अडीचशें कोटींच्या कामाची निविदा काढली. त्यानंतर कामासाठी जागाच नसल्याने हे काम रखडले. या रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ अधिक असल्याने अनेक अपघात घडले आहेत त्यात काहींचे प्राण गेले असून अनेक जण जायबंदी झाले आहेत.

त्यामुळे महापालिकेने दोन वर्षांपूर्वी हा रस्ता ५० मीटरच रूंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे भूसंपदानाचा खर्च कमी होऊन तो २८० कोटी झाला. यामध्ये महापालिकेने ८० कोटींचा खर्च करण्याची तयारी दाखवित शासनाकडे २०० कोटींच्या निधीची मागणी केली. मात्र, शासनाने केवळ १४० कोटीच निधी दिला. त्यातून ५०० मीटर रस्त्यासाठी भूसंपादन सुरू आहे.

### रस्त्यासाठी केंद्रशसनाची मदत...

» दरम्यान, काही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कात्रज-कोंढवा रस्त्यासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये महापालिकेने भूसंपादन करून द्यावे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे रस्त्याचे काम केले जाईल, अशी सूचना केली आहे. त्यामुळे महापालिकेने आता संपूर्ण रस्ता ८४ मिटर रुंदीचा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ८४ मिटर रुंदीचा रस्ता करण्यासाठी महापालिकेला ९० हजार चौरस मिटर जागेची आवश्यकता आहे, त्यासाठी २३१ कोटी रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम उपलब्ध व्हावी यासाठी प्रस्ताव पाठवला असल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.